महाराष्ट्र शासन

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सातारा

**Government Medical College and District Hospital Satara,**
**467, Sadar bazar, Camp, Satara 415001**
**Phone No 02162-299851,299763** **Email id :- deangmcsatara7@gmail.com**

जा.क्र.भांडार/उपकरणे देखभाल/ प्र.क्र.१५/ 1671 /२०२३ दि.07/०७/२०२३

**दरपत्रक सुचना**

प्रति,
मा. संचालक,
माहिती व तंत्रज्ञान विभाग,
७ वा मजला, मुख्य ईमारत,
मंत्रालय, मुंबई.

विषय - शासनाच्या संकेतस्थळावर(www.maharashtra.gov.in) दरमागणी पत्र प्रसिध्द करणेबाबत.
संदर्भ - या कार्यालयाचे दरमागणी पत्र.

महोदय,

उपरोक्त संदर्भीय विषयानूसार, अधिष्ठाता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सातारा करीता एक वर्ष कालावधीसाठी भाडेतत्त्वावर एक वाहन पुरविणेकरीता प्रक्रीया राबविण्यात येत आहे. सदर भाडेतत्त्वावरील वाहन हे खुल्या बाजारातून स्पर्धात्मक पध्दतीने लावायचे असल्याने आवश्यक दरमागणी **प्रथम मुदतवाढ** सुचना पत्र शासनाच्या संकेतस्थळावर (www.maharashtra.gov.in) प्रसिध्द करायचे आहे. त्याअनुषंगाने या पत्राव्दारे दरमागणी पत्र प्रसिध्द करण्याकरीता सोबत सादर करण्यात येत आहे. सदर दरमागणी पत्र प्रसिध्द करण्यास विनंती.

आपल्या माहिती व पुढील कार्यवाहीस्तव सविनय सादर.

सोबत - वरिलप्रमाणे.

आपला विश्वासू,

अधिष्ठाता
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय
सातारा.

Dean
Government Medical College
and
General Hospital, Satara

महाराष्ट्र शासन

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सातारा

**Government Medical College and District Hospital Satara,**
**467, Sadar bazar, Camp, Satara 415001**
**Phone No 02162-299851,299763** **Email id :- deangmcsatara7@gmail.com**

जा.क्र.भांडार/उपकरणे देखभाल/ प्र.क्र.१५/ 1671 /२०२३ दि. 7/०७/२०२३

## दरपत्रक सुचना

**प्रथम मुदतवाढ**

विषय- शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सातारा या संस्थेकरिता वाहन भाडेतत्वावर लावणेबाबत.

अधिष्ठाता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सातारा यांना शासकीय कामकाजाकरिता एक वर्ष कालावधीसाठी भाडेतत्त्वावर एक वाहन पुरविणे प्रस्तावित आहे. त्याकरीता मोहोरबंद पाकीटात दरपत्रके मागविण्यात आले होते. तथापि दरपत्रक सूचनेस एकाही पुरवठादाराचा प्रतिसाद प्राप्त झालेला नाही त्यामुळे यादवारे दरपत्रक सुचनेस मुदतवाढ देण्यात येत आहे.

खालील अटी व शर्ती पुर्ण करित असलेल्या वाहन पुरवठा दार यांनी आपले मोहोरबंद दरपत्रके अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, ४६७ संदर बझार, जिल्हा रुग्णालय आवार, सातारा या पत्त्यावर दि.17 /07 /२०२३ पर्यंत रोजी साय ५.०० वाजेपर्यंत सादर करु शकता.

**कार्यालयाच्या अटी आणि शर्ती खालील प्रमाणे.**

१. भाडेतत्त्वावर वाहन पुरवठा करण्यासाठी नमुद करावयाचे दर हे प्रती वाहन, प्रती महिना सर्व करांसहीत नमुद करावेत.

२. वाहनाची मासिक धाव अंदाजे २००० कि.मी. इतकी गृहीत धरुन उक्त दर सर्व करासहीत कार्यालयास सादर करावे.

३. आपातकालीन परिस्थितीत वाहनाची धाव २००० कि.मी. पेक्षा जास्त झाल्यास २००० कि.मी. पुढील आपले प्रती कि.मी. किमान दर नमुद करावेत. भाडेतत्वावरील वाहनाचे दर हे इंधन, वंगण, वाहन चालकाचे वेतन, टोलनाका व वाहनाचे सर्व देय शासकीय करासहीत असावेत.

| अ.क्र. | वाहनाचा प्रकार | वाहनाचा क्रमांक | वाहनाचे बनावट वर्ष | बनावट | २००० कि.मी. पर्यंत सरासरी दर | २००० कि.मी. पुढील सरासरी दर |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

४. सदर वाहन हे महाराष्ट्र राज्यातील असणे आवश्यक आहे.

५. वाहन शासकीय कामासाठी भाडेतत्त्वावर वापरायचे असल्याने मोटार वाहन कायदा १९८८ च्या अधिनियमातील तरतुदीनुसार वाहनास वाहतूकीचा परवाना (परमीट) असणे आवश्यक आहे.

६. सदर वाहन हे पाच वर्षापेक्षा आतील असावे. वाहनाचा प्रकार सेडान किंवा एस.यु.व्ही असणे अपेक्षीत आहे. ( मारुती सुझुकी/हुंडाई ॲक्सेट/होंडा अमेझ या गाडयांना प्राधान्य राहील)

७. सदर वाहन सातारा जिल्हयात व महाराष्ट्रात इतर भागात क्षेत्रीय / प्रशासकीय कामासाठी वापरण्यात येईल.

८. वाहनाची किरकोळ अथवा मोठ्या स्वरुपाची दुरुस्ती करणेही वाहन पुरवठादाराची जबाबदारी राहील, वाहन दुरुस्तीच्या कालावधीत वाहन पुरवठादाराने पर्यायी वाहन उपलब्ध करुन द्यावे लागेल. वाहन वापराच्या कालावधीमध्ये झालेल्या अपघातास सदर कार्यालय कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही त्याची सर्वस्वी जबाबदारी वाहन मालकाची राहील व कोणतीही नुकसान भरपाई बाबत कार्यालयामार्फत अदा करणेची मागणी करता येणार नाही.

९. वाहनाचे सर्व कागदपत्र उदा. रजिस्ट्रेशन पुस्तक, कराधान पुस्तक, वाहनाचा विमा, वाहतूक परवान्याची कागदपत्रे व वाहनचालकाचा वाहन चालविण्याचा परवाना, आरटीओ कडून वाहनाचा तांत्रिक तपासणी दाखला इ. कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रती वाहन पुरवठादारास सादर करणे बंधनकारक राहिल.

१०. भाडेतत्त्वावर वाहन पुरविणा-या पुरवठादाराने महिन्याचे देयक कार्यालयास दरमहा सादर करावे लागेल व त्या सोबत संपूर्ण महिन्याची फिरतीच्या नोंदीचा गोषवारा सादर करणे बंधनकारक राहिल. त्यावर फिरती करणारे अधिकारी / कर्मचारी यांची दैनिक फिरती नोंदीवर स्वाक्षरी घेऊन देयकासोबत जोडणे आवश्यक राहिल. फिरस्ती दरम्यान लागणारा पथकर (टोलनाका) वाहन पुरवठादाराने भरावे व टोल पुराव्याच्या पावत्या देयकासोबत जोडून महिन्याच्या देयकासोबत प्राप्त करुन घ्यावा. वाहनास Fasttag असणे अनिवार्य आहे अन्यथा टोलचे देयक अदा केले जाणार नाही.

११. भाडेतत्त्वावरील वाहन पुरवठा करणा-या ज्या वाहन पुरवठादाराचे कंत्राटी दर मंजूर होतील त्यांना मुद्रांक शुल्क नियमानूसार जी रक्कम निश्चित होईल त्या रक्कमेच्या स्टॅम्प पेपरवर अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचा करारनामा करुन द्यावा लागेल.

१२. करारातील कोणत्याही अटीचा भंग झाल्यास करार कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्याचे अधिकार कार्यालयास राहतील. व तसेच शासनाच्या धोरणामध्ये काही बदल झाल्यास अथवा काही अपरिहार्य कारणास्तव आवश्यकता भासल्यास कुठलेही कारण न देता वाहनासाठी केलेला करारनामा संपुष्ठात आणण्याचा अधिकार या कार्यालयाकडे राखून ठेवला आहे.

१३. भाडेतत्वावरील वाहन पुर्ण वेळ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सातारा या कार्यालयाच्या अधिनिस्त असेल. त्यासाठी चालकाला कुठलाही अतिरिक्त भत्ता दिला जाणार नाही.

१४. वाहनाचे नोंदणी (उत्पादक वर्ष ) ऑगस्ट २०१९ नंतरचे असणे आवश्यक आहे. तसेच वाहन सुस्थितीत (सस्पेंशन, टायर, बंद बॉडी, कुशन इत्यादी) असणे आवश्यक आहे.

१५. वाहन अनुउपलब्धतेबाबत किमान ३ दिवस अगोदर कार्यालयास लेखी सूचना देणे बंधनकारक राहिल. वाहन केवळ वाहन पुरवठादाराच्या अकार्यक्षमतेमुळे बंद राहिल्यास व त्यामुळे कामकाजावर अनिष्ठ परिणाम झाल्यास निर्धारित कंत्राट ठरल्यानंतर जे प्रति दिवस दर येतील त्याप्रमाणे तेवढया दिवसाचे पैसे देयकातून वजा करून घेण्यात येईल.

१६. वाहन पुरवठादाराचे वाहन चालक हे निर्व्यसनी व वैदयकीय दृष्टया पात्र असावेत.

१७. कार्यालयीन वेळेत किंवा शासकिय सुटटीच्या दिवशी वर नमुद वाहनाची इतर प्रवासी वाहतूक कामासाठी वापर करता येणार नाही. वाहनाचा अशाप्रकारचा वापर झाल्याचे निर्दशनास आल्यास वाहन तात्काळ निलंबित करून पुरवठादार संस्थेस काळया यादीत टाकण्यात येईल.

१८. इंधन दरात बदल झाला तरी कोणतीही दर वाढ मिळणार नाही.

१९. करारातील कोणत्याही अटीचा भंग झाल्यास करार कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्याचे अधिकार कार्यालयास राहतील.

२०. शासनाच्या धोरणामध्ये काही बदल झाल्यास अथवा काही अपरिहार्य कारणास्तव आवश्यकता भासल्यास कुठलेही कारण न देता वाहनासाठी केलेला करारनामा संपुष्ठात आणण्याचा अधिकार अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सातारा यांचेकडे राखून ठेवलेला आहे.

२१. निधी उपलब्धतेनुसार देयके अदा केले जातील प्रलंबित देयकावर कोणतेही व्याज देय राहणार नाही.

२२. किमान दर आलेले वाहन पुरवठादार जर आवश्यकतेनुसार वाहन पुरवठा करु शकत नसल्यास उर्वरित पात्र निविदाधारकांशी आवश्यकतेनुसार L२, L३ अशा क्रमाने दरांबाबत वाटाघाटी करुन मंजूर किमान दराने वाहने भाडयाने लावण्याबाबत निर्णय घेण्याचे अधिकार राखून ठेवण्यात आले आहेत.

२३. भाडयाने लावण्यात आलेले वाहन निधी अभावी किंवा इतर कोणत्या ही शासकिय कारणास्तव करार संपण्यापुर्वी करार रदद/वाहन बंद करण्याचे अधिकार अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सातारा यांचे राहील.

२४. देयक अदायगी करताना TDS/GST/IT ची नियमानुसार कपात करण्यात येईल.

२५. वाहन वापराच्या कालावधीमध्ये झालेल्या अपघातास शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सातारा हे कार्यालय कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही व त्याची सर्वस्वी जबाबदारी वाहनमालकाची राहील.करार कालावधीत वाहन पुरवठादाराने हेतु पुरस्कृत कार्यालयीन कामाच्या वापरासाठी वाहन उपलब्ध करून न दिल्यास पर्यायी वाहन लावल्यामुळे जादाचा खर्च सोसावा लागल्यास सदर खर्च त्यांना देय असलेल्या वाहन भाडयाच्या देयकातून वसुल करण्यात येईल. तसेच अशी स्थिती वारंवार उदभवल्यास करार रदद करून सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्याची कार्यवाही करण्यात येईल. तसेच वाहन पुरवठादारास वाहन पुरवठा केलेली वाहने रदद करावयाची असल्यास त्यांचे कडून एक महिन्याचे भाडे पटटा दंड स्वरूपात वसूल केला जाईल.

२६. वाहन पुरवठादाराने प्रतिष्ठित विमा कंपनीकडून वाहनाची (वाहन व प्रवासी यासह) विमापॉलिसी (Full Insurance) काढलेली असावी. वाहनमालकाने मूळ विमा पॉलिसीचे हप्ते आणि चार्जेस भरले असल्याचे पुरावे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सातारा यांना सादर करावेत. पुरवठा दाराने वाहनाचा व वाहन चालकाचा विमा पत्रक घेणे बंधनकारक आहे.

२७. दोन ठेकेदाराचे दर समान आलेस ज्या पुरवठादाराचे वाहन नवीन असेल व कि.मी. कमी प्रवास झाला असेल त्यास प्राधान्य देण्यात येईल.

२८. वरील सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेच्या लेटर हेड वर प्रतिज्ञापत्र पुरवठा आदेश घेते वेळी अधिष्ठाता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सातारा या कार्यालयास सादर करणे गरजेचे आहे.

अधिष्ठाता

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सातारा

Dean
Government Medical College
and
General Hospital, Satara